# महर्षी विनोद यांचे विचार आजच्या काळातही पथदर्शी

**प्रतिनिधी, पुणे**

**महर्षी विनोद** यांचे 'धवलगिरी'सारखे वाङ्मय आणि जीवनप्रवास आजच्या काळातही सर्वार्थाने मार्गदर्शक आहे, असे मत परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी व्यक्त केले.

महर्षी विनोद रिसर्च फाउंडेशनतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित व्यासपूजा महोत्सवात रावते बोलत होते. खासदार अनिल शिरोळे आणि डॉ. संप्रसाद विनोद या वेळी उपस्थित होते. व्यासपूजा महोत्सवाचे यंदा ७४ वे वर्ष होते.

सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यातील सद्गुरु कृपेचे महत्त्व आणि त्यामुळे संघर्षातूनही होणारी सुकर वाटचाल याविषयी रावते यांनी अनुभव मांडले. शिरोळे यांनी संस्थेमध्ये योग प्रशिक्षण घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. शांतिमंदिर येथे झालेल्या कार्यक्रमात 'मला समजलेले महर्षी विनोद' या विषयावर श्यामसुंदर बापट यांनी मनोगत व्यक्त केले. महर्षी न्यायरत्न विनोद यांना त्यांच्या साधना काळात हरिद्वार येथे मिळालेल्या पादुकांचे योगसाधकांनी सामुदायिक पूजन केले. या वेळी मंत्रघोष आणि महर्षींना अतिंद्रिय अवस्थेत स्फुरलेल्या गुरुपादुकेय स्तोत्राचे पठण करण्यात आले. उत्तम शहाणे गुरुजी आणि मिलिंद परांजपे गुरुजी यांनी शांतिपाठाचे पठण केले. समन्वय विनोद यांच्या तबलावादनाने सारे मंत्रमुग्ध झाले.

डॉ. ऋजुता विनोद यांच्या पुढाकाराने बुकगंगा प्रकाशनतर्फे 'महर्षी न्यायरत्न विनोद यांच्या अभंगसंहिता' या पुस्तकाच्या ऑडिओ बुकचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. संप्रसाद विनोद यांनी 'विशुद्ध आध्यात्म आणि विशुद्ध ज्ञानाची आजच्या काळातील गरज' या विषयी मार्गदर्शन केले. सामुदायिक ओंकार जप, प्रार्थना करण्यात आली.

लोकसत्ता Wed, 12 July 2017
epaper.loksatta.com//c/20478853